# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
## महापालिका सचिव विभाग

संकेतस्थळ : www.chhsambhajinagarmc.org.

जा.क्र.मनपा/ मपा.सचिव/2025/35 दिनांक:- 01.03.2025

प्रति,
उपआयुक्त-6,
तथा कक्ष प्रमुख ई-गव्हर्नन्स,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**विषय:- संकेतस्थळावर महापालिका सचिव विभागाची माहिती अद्यावत करणे बाबत.**

संदर्भ:-जा.क्र.मनपा/संगणक/2025/63 दि.20.03.2025

वरील संदर्भीय विषयी महापालिका सचिव विभागाची माहिती हार्ड कॉपी आपणाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच सॉफ्ट कॉपी compdep.csmc@gmail.com या संकेतस्थळावर आपण सांगितल्याप्रमाणे मेल करण्यात आलेली आहे.

करीता, आपल्या माहितीस्तव.

सोबत:- वरीलप्रमाणे.

**अपर्णा थेटे**
महापालिका सचिव
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,
## महापालिका सचिव विभाग

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचा कार्यकाळ हा दि.28.04.2020 रोजी संपुष्टात आलेला आहे. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका न झाल्याने दि.29.04.2020 पासुन या महानगरपालिकेत प्रशासकीय कार्यकाळ आजपर्यंत चालु आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-2015 नुसार एकुण 115 प्रभागातून पालिका सदस्यांची निवड झालेली आहे. सन-2015 नुसार निर्वाचित पालिका सदस्यांची संख्या खालील प्रमाणे होती.

| अ.क्र. | पक्षाचे नाव | निर्वाचित पालिका सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| 1. | शिवसेना | 29 |
| 2. | भारतीय जनता पार्टी | 23 |
| 3. | ए.आय.एम.आय.एम. | 24 |
| 4. | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | 11 |
| 5. | नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी | 04 |
| 6. | आर.पी.आय. (डी) | 02 |
| 7. | बहुजन समाज पार्टी | 05 |
| 8. | अपक्ष | 17 |
| | **एकुण** | **115** |
| | **नामनिर्देशित पालिका सदस्य** | **05** |
| | **एकुण** | **120** |

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये खालील प्रमाणे सभांचे आयोजन करण्यात येते.**

1. सर्वसाधारण सभा :- पालिका सदस्यांची संख्या 115+05=120 महिन्यातुन किमान 01 सभा
2. स्थायी समिती सभा :- पालिका सदस्यांची संख्या =16 आठवड्यातुन किमान 01 सभा
3. प्रभाग समिती सभा :- प्रभाग समित्या प्रभाग क्र.01 ते 10 प्रत्येक प्रभाग समितीची सभा त्या-त्या प्रभाग कार्यालयात होते. प्रभाग समितीत 12/13 निर्वाचित पालिका सदस्य असतात.
4. विशेष समिती सभा :- 5 विशेष समित्या पुढील प्रमाणे आहेत. प्रत्येक विशेष समिती मध्ये 9 सदस्य असतात.

**<u>विशेष समित्या</u>**

1. महिला व बालकल्याण समिती
2. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती
3. शहर सुधार समिती
4. माध्यमिक, पुर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती
5. गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाज कल्याण समिती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 चे कलम 19(1) अन्वये महापौर व उपमहापौर यांचा पदावधी अडीच वर्षाचा आहे. त्यानुसार माजी महापौर व उपमहापौर यांचा पदावधी दि.28.04.2020 रोजी संपुष्टात आलेला आहे. दि.29.04.2020 पासुन प्रशासकीय कार्यकाळ चालु आहे.

स्थायी समिती सभापती, प्रभाग समिती सभापती व विशेष समित्यांच्या सभापतीचा पदावधी हा एक वर्षाचा असतो. मा.महापौर, मा.सभापती स्थायी समिती व मा.विशेष समिती सभापती यांचेकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनुसार, नियमाप्रमाणे सभांचे आयोजन करणे, संपन्न झालेल्या सभांच्या इतिवृत्तांताची नोंद ठेवणे, स.पालिका सदस्यांनी वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नांची माहिती घेऊन सभासदांना पुरविणे आणि महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम 1986 अन्वये कार्यवाही करणे इ.कामे महापालिका सचिव विभागामार्फत केली जातात.

महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभापती/उपसभापती महिला व बालकल्याण, सभापती प्रभाग समिती तसेच सभापती पाच विशेष समिती यांची निवडणुकीची पुर्ण प्रक्रिया महापालिका सचिव विभागामार्फत करण्यात येते.

याच बरोबर शासकीय पत्रव्यवहार, नियमित कार्यालयीन कामे, पालिका सदस्यांचे मानधन, बैठक भत्ता, बैठकींची व्यवस्था करणे, पालिका सदस्यांचे अभ्यास दौरे, इ कामे करावी लागतात.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 48 अन्वये नगर सचिव यांचे कार्य व कर्तव्ये नेमुन देण्यात आलेले आहेत. महापालिका सचिव विभागामार्फत मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.विशेष समिती सभापती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.गटनेता व महापालिका सचिव विभाग अंतर्गत प्रशासकीय कामकाज तसेच या सर्व दालनावरील अधिकारी/ कर्मचारी यांची सेवा परिश्रम व त्यांची सेवाकार्य बाबतीत महापालिका सचिव यांचे नियंत्रण असते.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभांचे मराठीतून वृत्तांत संगणकावर टंकलेखित करुन महानगरपालिकेच्या वेबसाईवर टाकण्याचे काम महापालिका सचिव विभागातर्फे करण्यात येते. यामध्ये सन-1988 ते जानेवारी-2025 पर्यंतचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत/कार्यवृत्तांत वेबसाईटवर टाकण्याचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच महापालिका स्थापन झाल्यापासुन म्हणजेच सन 1982 ते 1987 या प्रशासक कार्यकाळातील सभांचे इतिवृत्तांत वेबसाईटवर टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

**अधिकारी व कर्मचारी यांची माहिती**

| क्र. | पदनाम | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव श्री/श्रीमती | वर्ग | दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | **महापालिका सचिव** | **अपर्णा थेटे** | **1** | **9096549990** |
| 2. | लघुलेखक | कैलास एस.नवले | 3 | 9763269178 |
| 3. | अधिक्षक | गोविंद आर.पेरकर | 3 | 9923286666 |
| 4. | कनिष्ठ लिपीक | सोहेल अहमद खान | 3 | 8668515509 |
| 5. | कनिष्ठ लिपीक | सुनिता देवराव भालेराव | 3 | 9673068736 |
| 6. | शिपाई | केशरबाई पंडित | 4 | 8080081155 |
| 7. | शिपाई | भाऊसाहेब गायकवाड | 4 | 8208965160 |
| 8. | शिपाई | रमेश पवार | 4 | 9356008095 |
| 9. | हमाल | सलिमोद्दीन शेख | 4 | 9960880167 |

**महापालिका** सचिव विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कर्तव्यांचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | कर्तव्ये |
|---|---|---|
| 1. | महापालिका सचिव | महानगरपालिका (महासभा) स्थायी समिती, व विषय समित्यांचे पदसिध्द सचिव म्हणुन करावायाची कर्तव्ये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 48 व 53(2) मध्ये नमुद केल्याप्रमाणे कर्तव्ये. |
| 2. | लघुलेखक | विभागाअंतर्गत होणाऱ्या सभांचे इतिवृत्त घेणे व कारणापुरता उतारे तयार करणे आणि विभाग प्रमुख यांनी नेमुन दिलेले कामे करणे. |
| 3. | अधिक्षक | विभागांतर्गत नेमुन दिलेले प्रशासकीय कामे करणे. |
| 4. | कनिष्ठ लिपीक | विभागांतर्गत नेमुन दिलेले प्रशासकीय कामे करणे. |
| 5. | शिपाई | विभागांतर्गत नेमुन दिलेले कामे करणे. |

# महापालिका सचिव विभागाचा संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरवार तपशील

**आयुक्त**

- महापालिका सचिव
  - लघुलेखक/लघुटंकलेखक
  - कार्यालय अधिक्षक
    - पदाधिकारी दालनावरील वरिष्ठ लिपीक
      - कनिष्ठ लिपीक
        - शिपाई
    - वरिष्ठ  लिपीक
      - संगणक ऑपरेटर/कनिष्ठ लिपीक
        - नाईक
          - शिपाई
  - स्वीय सहाय्यक, महापौर
    - का.अधिक्षक/वरिष्ठ लिपीक
      - कनिष्ठ लिपीक
        - चोपदार
          - शिपाई

**महापालिका सचिव विभागाची वैशिष्ट्यपुर्ण कामे (पुर्ण झालेली किंवा प्रस्तावित कामे)**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आगामी सार्वत्रिक निवडणुकीत नवनिर्वाचित झालेल्या पालिका सदस्यांना सभा कामकाज नियमावली अद्यावत करणे व स.सदस्यांना वितरीत करणे. हे काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

**अपर्णा थेटे**
महापालिका सचिव
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका